# आकाशवाणी नागपूर,

# प्रादेशिक वृत्त विभाग

# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

# शुक्रवार दिनांक ०१ ऑगस्ट २०२५

## ठळक बातम्या

1. **भाषा राजाश्रित असली तरी ती लोकाश्रित असली पाहिजे- सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचं प्रतिपादन, नागपूर इथल्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या परिसरात शैक्षणिक भवनाचं लोकार्पण.**
2. **केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान.**
3. **महसूल विभाग अधिक गतिमान व पारदर्शक करण्याचा संकल्प करूया- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महसूल दिन आणि सप्ताहानिमित्त विविध योजनांचा शुभारंभ.**
4. **लवकरच एसटीचे रिटेल अर्थात किरकोळ इंधन विक्रीत पदार्पण- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती.**

## आता सविस्तर बातम्या .......

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ

भाषा राजाश्रित असली तरी ती लोकाश्रित असली पाहिजे, संस्कृत ही हळूहळू बोलचालीची भाषा झाली पाहिजे, याकरता प्रयत्न करणं गरजेचं असल्याचं, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अभिनवभारती आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिसरात डॉ.केशव बळीराम हेडगेवार आंतरराष्ट्रीय शैक्षणिक भवनाचं लोकार्पण आज भागवत यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपस्थितांना भाव आणि भाषा यामधील संबंध यावर प्रकाश टाकताना त्यांनी भारताच्या जी २० मधील वसुधैव कुटुंबकं या ब्रीदवाक्याचं उदाहरण दिले-

***ते ग्लोबल मार्केट म्हणतात, आपण ग्लोबल फॅमिली म्हणतो हा फरक कसा आला, हा फरक भावामुळे आला, त्या भावामुळे भाषा बदलली, भाषा हे त्या भावाच फलित***

***आहे हे चक्र भाषेतून भाव, भावातून व्यवहार, व्यवहारातून भाषा हे चालू असते आणि त्याच्यामुळे आपली ही परंपरा आपला हा भाव विकसित करणारी किंवा तिथं आधारानी विकास झाला ती भाषा संस्कृत आहे ती कळली पाहिजे सगळ्या आणि तो भाव पडून त्याच्या आधारावर जीवन व्यवहार झाला तर त्यातून संस्कृतचाही विकास होईल.***

दरम्यान, संस्कृत फक्त शासनाच्या ब्रीदवाक्यापुरतीच मर्यादित न राहता ती जनमानसात रुजावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली. विद्यापीठाच्या माध्यमाने संस्कृतचा प्रचार - प्रसार मोठ्या प्रमाणात व्हावा, असे फडणवीस म्हणाले-

***राष्ट्रीय संकुल तयार करतोय आहे. निश्चित त्या संकुलाच्या माध्यमातंन आपल्या संस्कृत भाषेला आपण ही आंतरराष्ट्रीय भाषा आहेच, पण तिच्या प्रचार प्रसारामध्ये निश्चितपणे अतिशय मोलाच योगदान आपण करू शकू हा आम्हाला विश्वास आहे.***

याप्रसंगी देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की डॉक्टर केशव हेडगेवार यांनी भारतीय जीवन पद्धती संस्कार मूल्य हे जगाला पटवून दिले. त्यांचे नाव कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठातील शैक्षणिक संकुलाला मिळणे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. संस्कृत विद्यापीठाला जागतिक दर्जाचं विद्यापीठ बनवण्यासाठी मास्टर प्लान सादर करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार

देशात विश्वगुरू बनण्याची क्षमता आहे. येणाऱ्या काळात देशात सर्वाधिक तरुण, गुणवान तंत्रज्ञ तयार होत आहेत. आत्मविश्वास, सकारात्मकता कायम राखल्यास लोकमान्य टिळकांनी पाहिलेलं स्वराज्याचे स्वप्न सत्यात उतरेल, असा आशावाद रस्ते वाहतूक आणि महामार्ग खात्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज पुण्यात पुरस्काराला उत्तर देताना व्यक्त केला. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज लोकमान्य टिळक ट्रस्टचा राष्ट्रीय पुरस्कार पुण्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना प्रदान करण्यात आला. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टिळक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

आदी मान्यवर  उपस्थित होते. यावेळी गडकरी यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद आणि अभिमान  असल्याचे सांगितले.

***लोकमान्य टिळकांचे व्यक्तित्व, कर्तृत्व, नेतृत्व हे खऱ्या अर्थाने व्यासंगी होते. अगदी भगवद्गीतेवर त्यांनी लिहिलेलं गीता रहस्य असेल, ज्ञान, धर्म, समाजकार्य, शिक्षण, पत्रकारिता या सगळ्या क्षेत्रात त्यांचा काम आजही आपण सगळेजण आठवतो आणि त्यामुळे त्यांच्या नावाने असणारा पुरस्कार मला मिळाला, ही माझ्याकरता आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे.***

लोकमान्य टिळकांसारखा बाणा असणारे नितीन गडकरी हे केवळ नेते नाहीत, तर संशोधक असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. पक्षीय राजकारणापेक्षा विकासाचे राजकारण करत देशात रस्ते, महामार्ग, पूल यांचं जाळे भक्कम करत देशाच्या विकासात मोलाचं योगदान दिलं, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नितीन गडकरी यांच्या कार्याचा गौरव केला. याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचं जे स्वप्न पाहिलं आहे, त्याच्या शिल्पकारांपैकी नितीन गडकरी एक आहेत.

पंतप्रधान/वाराणसी

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या उत्तरप्रदेशात वाराणसी इथं जाणार असून, पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं अनावरण त्यांच्या हस्ते होणार आहे. या योजनेअंतर्गत नऊ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना २० हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरीत केली जाईल. उत्तर प्रदेशातल्या दोन हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

संसद

विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं आहे. लोकसभेत ११ वाजता कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला, त्याचवेळी विरोधी पक्षांनी बिहारमधलं मतदारयाद्या पुनरीक्षण रद्द करावं, या मागणीसाठी घोषणा द्यायला सुरुवात केली. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केलं, नंतरही गदारोळ चालूच राहिल्यानं दिवसभरासाठी स्थगित केलं.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

शासनाच्या विविध उपयोजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी प्रामुख्याने महसूल विभागाची आहे. त्यामुळे प्रशासनाबद्दलच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महसूल विभाग अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्याचा संकल्प आहे. लोकाभिमूख प्रशासन ही संकल्पना पूर्ण करण्यासाठी महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारी स्विकारण्याचे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. नियोजन भवन येथे महसूल दिन आणि सप्ताहाचे उद्घाटन तसेच विविध उपक्रम आणि योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. महसूल विभागाचे सर्व प्रशासकीय प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिल्यामुळे 68 अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना निवड श्रेणी देवून त्यांना त्यांच्या पुढील पदोन्नतीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी हे पद महत्वाचे असून अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रेणीमध्ये रूपांतरित करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

एसटी

उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्याच्या हेतूने केंद्र आणि राज्य सरकारच्या व्यावसायिक भागिदारीतून एसटी महामंडळ राज्यभरात स्वतःच्या जागेवर विविध ठिकाणी व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्रीचे किरकोळ विक्री पंप सुरू करीत असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती नाजूक आहे. अशा परिस्थितीमध्ये केवळ प्रवासी तिकीट विक्रीतून मिळणाऱ्या महसुला वर अवलंबून राहणे श्रेयस्कर नाही. त्यासाठी उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. गेली ७० वर्षापेक्षा अधिक काळ एसटी महामंडळ इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियम या सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल कंपन्यांच्या कडून डिझेल इंधन विकत घेत आहे. सध्या २५१ ठिकाणी एसटीच्या स्वतः च्या जागेवर पेट्रोल पंप उभारले असून याद्वारे केवळ एसटीच्या बसेस साठी डिझेल इंधनाचे वितरण होते.

उपराष्ट्रपती निवडणूक

नव्या उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी भारत निवडणूक आयोगानं आज निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. येत्या ७ ऑगस्टला निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी होईल. २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत राहील, तर ९ सप्टेंबरला मतदान

होणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झालं आहे.

सूचना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आगामी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणासाठी जनतेकडून सूचना मागवल्या आहेत. यंदाच्या भाषणात कोणते विषय समाविष्ट व्हावेत, याविषयी नागरिकांनी MyGov आणि NaMo App वर विचार सामाईक करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

खातेबदल

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात खातेबदल झाला आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना आता युवा, क्रीडा आणि औकाफ खातं मिळालं असून दत्तात्रय भरणे आता कृषीमंत्री असतील. माणिकराव कोकाटे आक्षेपार्ह वक्तव्यांसह विविध कारणांसाठी वादात सापडले होते.

अण्णाभाऊ साठे

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना राज्यात सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. अण्णाभाऊ साठे यांनी दाखवलेल्या वंचितांच्या विकासाच्या मार्गावर राज्य शासन चालेल, असं ते यावेळी म्हणाले.

भंडारा अपघात

भंडारा जिल्ह्यात रोवणी कामासाठी महिला मजुरांना घेऊन जाणारं वाहन उलटून झालेल्या अपघातात २१ महिला जखमी झाल्या. लाखनी तालुक्यात मासलमेटा लाखोरी वळणावर वाहनचालक एका बालकाला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना हा अपघात झाला. जखमी झालेल्या महिलाना लाखनी इथल्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

हवामान

नागपुरातील प्रादेशिक हवामान केंद्राने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार आज विदर्भातील नागपूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

******